सोमवार, दि. २९ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ४२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## फोटोशूटच्या पाहण्या थांबवा!

बाजी उम्रद येथील शेतकऱ्याचा संताप



**जालना । प्रतिनिधी -** मराठवाड्यात ढगफुटी पावसाने थैमान घातले असून शेतकरी अक्षरशः हातबल झाला आहे. शेतातील सर्व पिके पाण्याखाली गेली आहेत. विशेषतः सोयाबीन पिकाचा पूर्णपणे नाश झाला असून शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी अधिकच गंभीर झाली आहे. अशा परिस्थितीत मंत्री, आमदार आणि खासदार रस्त्याच्या कडेला मोठा फौजफाटा घेऊन, फक्त फोटोशूटच्या नावाखाली पाहणी करत आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

जालना तालूक्यातील बाजी उम्रद येथील एका संतप्त शेतकऱ्याने थेट प्रश्न उपस्थित केला की, तुमच्या या बनावटी पाहण्या आम्हाला नको आहेत. रोडवर उभे राहून फोटो काढू नका. प्रत्यक्षात आमच्या शेतात या, बांधावर चढा, पाण्यात उतरा आणि सोयाबीनचे हाल बघा. सोयाबीनला कोंब फुटल्यामुळे आमचे शंभर टक्के नुकसान झाले आहे. आता फक्त कागदावर नाही तर प्रत्यक्ष जमिनीवर परिस्थिती तपासा.

शेतकऱ्याने थेट सरकारला इशारा देत म्हटले की, शेतात अजूनही पाणी वाहत आहे, जमिनी खरडून गेल्या आहेत. या परिस्थितीत हेक्टरी ५० हजार रुपयांची नुकसानभरपाई तात्काळ जाहीर करा. अन्यथा शेतकऱ्यांसमोर आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही.

यावेळी बाजी उम्रद येथिल शेतकरी उद्धव डोंगरे बबन डोंगरे बापूराव मामा सवडे रामजी सावडे सुमित डोंगरे विशाल डोंगरे जगन पडूळ समाधान डोंगरे शिवाजी पळसे यांच्यासह अधी शेतकऱ्यांची उपस्थिती होती

# लाल रंगाचा राजाला अभय कधीपर्यंत?

## गुटखा बंदीचा कायदा कागदावरच; जिल्हा प्रशासन व पोलिसांची भूमिका संशयास्पद!

**दीपक शेळके**

**जालना -** सतिश उर्फ लाला या लाल रंगाच्या राजाने जालना जिल्ह्यात गुटख्याचे साम्राज्य उभारले आहे. राजनिवास, गोवा, हिरा, विमल, डायरेक्टर यांसारख्या प्रतिबंधीत गुटख्यांची खुलेआम विक्री होत असून युवकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. राज्य सरकारने गुटखा विक्रीवर बंदी घातली असतांना जिल्हा प्रशासन व पोलीस मात्र या धंद्याकडे दुर्लक्ष करत आहेत, असा रोष नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

गुटखा बंदीबाबतचे स्पष्ट कायदेशीर अधिष्ठान असूनही त्याकडे सर्रास दुर्लक्ष होत आहे खाद्य सुरक्षा व मानके अधिनियम २००६ (FSSI Act), औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४०, भारतीय न्याय संहिता (BNS).

गुटखा बंदी संदर्भातील कायदेशीर तरतुदी (BNS अंतर्गत)

BNS कलम २७३ (अन्नपदार्थात भेसळ किंवा प्रतिबंधीत वस्तूंची विक्री) मानवी सेवनास अयोग्य, अपायकारक किंवा प्रतिबंधीत अन्नपदार्थ विक्री, साठा किंवा वितरण करणे हा गुन्हा. शिक्षा : ६ महिने तुरुंगवास व दंड.

BNS कलम २७४ (अपायकारक अन्नपदार्थ विक्री) जर विक्री केलेला पदार्थ ग्राहकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणारा असेल. शिक्षा : १ वर्ष तुरुंगवास व दंड.

BNS कलम १२० (मानवी जीवनास अपायकारक पदार्थ देणे) विषारी किंवा अपायकारक पदार्थ देऊन व्यक्तीच्या आरोग्यास धोका निर्माण करणे. शिक्षा : १० वर्षांपर्यंत तुरुंगवास व दंड.

जिल्हाधिकारी यांच्याकडे गुटखा बंदीची अंमलबजावणी करण्याचे सर्वोच्च जबाबदारी आहे, पोलीस अधीक्षक यांच्याकडे तपास, छापे, गुन्हे नोंदवणे व BNS कलमांतर्गत दोषारोपपत्र दाखल करणे. तर अन्न व औषध प्रशासनाकडे गुटखा साठा व विक्री थांबवणे, गुटख्याच्या गाड्या अडवून कारवाई, परवाने रद्द करणे, नमुने तपासणी करणे असे अधिकार आहेत या अधिकारचा विसरच यांना पडला की काय अशी शंका उपस्थित होत आहे. तिघांचीही भूमिका मौनातच अडकलेली आहे. कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये लाल रंगाच्या राजाला वरून खाली अभय असल्याचा संशय व्यक्त होत आहे.



**गुटख्याचा मार्ग; पोलिसांच्या नाक्यावरून पास**

जळगाव-छत्रपती संभाजीनगर-जालना-बुलढाणा या चार जिल्ह्यांतून गुटख्याच्या गाड्या येतात. दीडशे ते २०० किलोमीटरचा प्रवास करून गाड्या थेट जालना शहरात पोहोचतात. सिंदखेड राजा रोडवरील पूर्वीचे ठिकाण सर्वश्रुत झाल्यावर आता तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतच नवीन ठिकाणी गाड्या उतरविल्या जात आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असताना पोलिसांना काहीही कळत नाही, हा संशय नागरिकांमध्ये अधिक गडद होत आहे.

गुटखा बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जालना जिल्ह्यात विशेष तपास यंत्रणा स्थापन करावी, गुटखा वाहतूक थांबवण्यासाठी नाकाबंदी मोहीम राबवावी, गुटखा माफियावर MPD (Maharashtra Prevention of Dangerous ctivities Act) अंतर्गत कारवाई करावी. व्यापारी व वाहतूकदारांचे परवाने रद्द करून गुन्हे दाखल करावेत.

गुटखा बंदी कायद्याने आहे, पण त्याची अंमलबजावणी मात्र लाल रंगाच्या राजाच्या हातात आहे असे नागरिकांना वाटत आहे. युवकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या या माफियाला संरक्षण मिळत असल्याचा स्पष्ट संशय आहे.

यावर जिल्हा प्रशासनाने तातडीने उत्तर दिले पाहिजे, गुटखा बंदी खरी आहे का? की ती फक्त कागदावरची औपचारिकता?

युवकांचे आरोग्य व जीवन वाचवणे ही खरी प्रशासनाची जबाबदारी आहे.

# जालना जिल्ह्यात 'अस्मानी संकटा'चा हाहाकार

## बळीराजाची 'ओला दुष्काळ' जाहीर करण्याची आक्रमक मागणी!

**जालना । प्रतिनिधी -** गेल्या काही दिवसांपासून जालना जिल्ह्यावर ढगफुटीसदृश्य पावसाचे भीषण संकट कोसळले असून, काल रविवार, २८ सप्टेंबर रोजी दुपारपर्यंत मिळालेल्या माहितीनुसार परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. १५ सप्टेंबर आणि २२ सप्टेंबरच्या अतिवृष्टीनंतर, २७ सप्टेंबरच्या रात्री पुन्हा झालेल्या मुसळधार पावसाने प्रशासनाचे दावे पूर्णपणे उघडे पाडले आहेत. जिल्ह्यातील नदी-नाले ओसंडून वाहत आहेत आणि सर्वत्र पुराचा तांडव सुरू आहे, ज्यामुळे सामान्य जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.









**पूरस्थितीमुळे शहरांमध्ये कोट्यवधींचे नुकसान**

जालना शहरासह भोकरदन, जाफराबाद, मंठा, परतूर, घनसावंगी, अंबड, आणि बदनापूर या सर्वच तालुक्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. कालच्या (२७ सप्टेंबर) रात्रीच्या पावसाने जालना आणि भोकरदन शहरातील व्यापारी पेठांमध्ये कहर केला.

**व्यापाऱ्यांचे मोठे नुकसानः** दुकानांमध्ये पाणी घुसल्याने मालाचे कोट्यवधींचे नुकसान झाले पान २ वर

अतिवृष्टीमुळे कुंभेफळ गावाचा संपर्क तुटला

# आ.अर्जुन खोतकर यांची पाण्यात जाऊन पाहणी



**जालना । प्रतिनिधी -** मराठवाड्यासह जालना जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाचा जोर कायम असून नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत जालना तालुक्यातील कुंभेफळ गावाचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. गावकऱ्यांना बाहेर जाणे अशक्य झाले असून जीवनावश्यक वस्तूंचाही तुटवडा निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

या गंभीर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आज सकाळी नऊ वाजता आमदार अर्जुन खोतकर स्वतः कुंभेफळ येथे गेले. कमरेइतक्या पाण्यात मानवी साखळी करून त्यांनी गावाता जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

गावकऱ्यांनी आ.खोतकरांकडे सर्वप्रथम नविन पुलाची पान २ वर

## इंदिरानगर येथील नागरिकांची घरे नियमित करण्यासाठी प्रयत्नशील

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील २०११ पुर्वी पासुन कायम वास्तव्य करीत असलेल्या सर्व नागरिकांच्या अतिक्रमन व काबीज असलेल्या जागा किंवा घर ही कायम स्वरुपी नावे किंवा नियमाकुल करण्यासाठी नगरपालिकेने प्रस्ताव मागविले असून याकामी इंदिरानगरातील नागरिकांना भरीव सहकार्य करणार असल्याची ग्वाही सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार ,ईम्रान कुरेशी यांनी दिली.

यासंदर्भात पाडेवार आणि कुरेशी यांनी सांगितले की, नगरपालिकेच्या वतीने २०११ पूर्वीपासून कायम वास्तव्य करीत असलेल्या इंदिरानगरातील नागरिकांकडून घरे नियमित करण्यासाठी प्रस्ताव मागविण्याची प्रक्रिया सुरु आहे.प्रस्ताव सादर करावा. जेणेकरून सर्व लाभार्थ्यांना भविष्यात विविध शासकीय योजना तसेच घरकुल व इतर योजनेचा लाभ घेण्यासाठी कुठल्याही अडचणी उद्भवणार नाही. अर्ज सादर करताना

सोबत २०११ पुर्वीचे अतिक्रमण असल्यासंबंधी लागणारी कागदपत्रे घराचा असेसमेंट उतारा , रेशन कार्ड, ,आधार कार्ड , रहिवासी दाखला ,उत्पन्नाचा दाखला ,घरासहीत भोगवटा धारकाचे फोटोः लाईट बिल,मतदान ओळखपत्र, नगरपालिकाने दिलेली कराची पावती सोबत देणे बंधनकारक आहे,तरी जास्तीत जास्त नागरिकांनी अर्ज सादर करावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार,ईम्रान भाई कुरेशी यांनी केले आहे.

# जालना महापालिकेच्या निष्क्रियतेमुळे विसर्जनाची संकटे

## व्यापाऱ्यांचे कोटींचे नुकसान, विसर्जन कुंड पाण्याखाली; प्रशासनावर बेफिकिरीचे आरोप

**जालना । प्रतिनिधी -** आई दुर्गेच्या विसर्जनाला अवघे चारच दिवस शिल्लक असताना जालना महापालिकेच्या निष्क्रिय कारभाराने पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेले विसर्जन कुंड पावसाच्या पाण्याखाली गेले असून, विसर्जन कसे पार पडणार, याची खात्री प्रशासनाकडून नागरिकांना मिळत नाही.

**व्यापाऱ्यांचे कोटींचे नुकसान - प्रशासन मौन**

१५ सप्टेंबर रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे शहरातील अनेक अंडरग्राऊंड कॉम्पलेक्समध्ये पाणी घुसले. महागड्या इलेक्ट्रॉनिक वस्तू, फर्निचर व इतर मालाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. व्यापारी हवालदिल झाले, पण महापालिकेने साधी पाहणीसुद्धा केली नाही. नुकसानभरपाई तर दूरच, प्रशासनाने व्यापाऱ्यांची व्यथा ऐकण्याची तसदीही घेतली नाही. हे व्यापारी आधीच मंदीने त्रस्त असताना त्यांच्या माथी प्रशासनाच्या निष्क्रियतेचे ओझे पडले आहे.

**कुंडासाठी कोटींचा खर्च - उपयोग शून्य?**

माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या संकल्पनेतून महापालिकेने विसर्जन कुंड बांधले. यात कोट्यवधी रुपये खर्च झाले. मात्र एका श्री गणेश विसर्जनानंतरच कुंड पाण्याखाली जाऊ लागले. पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी कोणतीही यंत्रणा उभारण्यात आली नाही. परिणामी दुर्गोत्सवात नागरिक आणि भाविकांना त्रास होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**प्रश्नांची सरबत्ती**

मनपाने विसर्जन कुंड उभारण्यापूर्वी पावसाचा अंदाज व जलनिस्सारणाचा विचार का केला नाही? केवळ निधी आला म्हणून घाईघाईत पान २ वर



## संपादकीय पान

# गर्दीचे व्यवस्थापन करण्यात अपयशी

दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेते आणि नव्यानेच राजकारणात प्रवेश केलेले तमिळगा वेत्री कळघम या पक्षाचे प्रमुख विजय थलपती यांनी आयोजित केलेल्या सभेत चेंगराचेंगरी होऊन ३९ जण मृत्युमुखी पडले आणि १२ जण गंभीर जखमी झाले. शनिवारी रात्री घडलेल्या या दुर्घटनेचा व्हिडिओ प्रसार माध्यमात व्हायरल झाला. ही दुर्घटना जितकी धक्कादायक आहे तितकीच ती चिंताजनक आहे. कारण भररस्त्यात आयोजित केलेल्या या सभेत तब्बल ६0 हजारांहून अधिक नागरिक उपस्थित होते. अतिशय छोट्या जागेत इतक्या मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहत असतील तर दुर्घटना घडेल हे शाळकरी मुलेही सांगतील. अभिनेते विजय यांनी पहिल्यांदाच अशी सभा केली असे नाही तर याआधीही त्यांनी काही दिवसांपूर्वी अशी रॅली आयोजित केली होती त्यातही लाखो नागरिकांची उपस्थिती होती तेंव्हाच अशी काही दुर्घटना घडली तर काय होईल अशी भीती व्यक्त करण्यात आली होती दुर्दैवाने ती भीती आता खरी ठरली अर्थात ही आपल्या देशात चेंगराचेंगरीची पहिली दुर्घटना नाही. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत. सध्या तर अशा दुर्घटनांची मालिकाच सुरू आहे. काही दिवसांपूर्वी बंगळुरू मध्ये झालेली चेंगराचेंगरीची दुर्घटना अजूनही ताजीच आहे. जून महिन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर सुरू झालेल्या जल्लोषाचे २४ तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले होते. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळीही अशीच चेंगराचेंगरी झाली त्यात ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला तर ३0 हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले होते. या दुर्घटनेनंतर बंगळुरू मध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली होती. आताही तशीच शोककळा देशभर पसरली आहे. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. या सभेला पोलिस आणि प्रशासनाने परवानगी दिली होती का ? कोणतीही सभा मोठ्या मैदानावर आयोजित केली जाते मग ही सभा रस्त्यावर का घेण्यात आली ? या सभेसाठी मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहणार याची कल्पना आयोजकांना आली नाही का? ज्या जागेची क्षमता वीस ते तीस हजार आहे तिथे दुप्पट नागरिक कसे जमा झाले ? ही सभा आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का ? इतकी मोठी सभा आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाशी, पोलिसांशी चर्चा केली होती का ? या सभेला अपेक्षेपेक्षा अधिक नागरिक जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का ? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या? गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेशे पोलिस बळ होते का ? ही राजकीय पक्षाची सभा होती. स्वतःचे राजकीय शक्तिप्रदर्शन दाखवण्यासाठी नागरिकांचा जीव धोक्यात घालणे कितपत योग्य? आणि सगळ्यात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप ३९ नागरिकांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण ? आयोजक, तमिळनाडू सरकार की स्वतःचा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही नागरिक? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपण आजही गर्दीचे व्यवस्थापन करण्यात कमी पडतो हे मान्यच करावे लागेल. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. परदेशात गर्दीचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने अधिकाऱ्यांना परदेशात पाठवावे. भारतीय लोक उत्सवप्रिय तसेच व्यक्तिपूजक आहेत. विशेषतः दक्षिणेत तर व्यक्तिपूजेचे मोठे अवडंबर आहे. यात तरुणांची संख्या अधिक आहे. नेते, अभिनेते यांना दैवत मानून त्यांच्या सभेत सहभागी होण्याची यांना फार हौस असते याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. नागरिकांनी आपल्या उत्साहाला आवर घालण्याची नितांत गरज आहे. आपल्या जिवापेक्षा मोठे काहीही नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अतिउत्साह जीवावर बेतू शकतो याचे भान नागरिकांनी ठेवावे. असे भान जर नागरिकांनी ठेवले आणि प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केले तर अशा दुर्घटना घडणार नाहीत आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही. आता झाले ते झाले पण किमान यापुढे तरी अशा दुर्घटना घडणार नाहीत याची खबरदारी प्रत्येकाने घ्यावी. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या ३९ नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# नवसाला पावणारी चिंचपाड्याची नवदुर्गा...

दुर्गा माता ही हिंदू धर्मातील एक शक्तिशाली देवी आहे, जिला आदिशक्ती मानले जाते आणि ती 'अजिंक्य' या अर्थाने ओळखली जाते. तिने दुर्गम राक्षस व इतर अनेक राक्षसांचा वध करून वाईटावर चांगल्याचा विजय मिळवला. ती पार्वती,चंडी,काली अशा अनेक रूपांमध्ये ओळखली जाते आणि नवरात्रात तिची विशेष पूजा केली जाते...अशीच काहीशी कल्याण पूर्वे तील चिंचपाड्याची नवदुर्गा म्हणून साईकृपा मित्र मंडळ गेली १९वर्षे नवरा नवरात्रोत्सव परंपरा मोठ्या उत्साहात जपत आहे. ही संस्कृती जपताना समाज आणि राष्ट्राला उपयुक्त ठरतील, असे अनेक बदल स्वीकारून मंडळाने एक वेगळा आदर्श देवी भक्तांना दिला आहे. सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या या मंडळाने आतापर्यंत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत. तसेच विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार लहान मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम चित्रकला स्पर्धा व मान्यवरांची गाठी-भेटी आयोजित करण्यात आली आहेत. समाज प्रबोधन करण्याचा वसा मंडळींने घेतला आहे.कल्याण (पूर्व) चिंचपाडा विभागातील उत्कृष्ट मंडळ म्हणून साई कृपा मित्र मंडळ उदयास येत आहे मराठी भक्ती संगीत सांप्रदायिक छंदिक भजन कार्यक्रम ठेवण्यात येतो मंडळाचे संस्थापक श्री.राजेश महावीर सौर्य सांगतात मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे मंडळाचा प्रत्येक सदस्यच हा अध्यक्ष..!! मूर्तीचे देखणे रूप हेच मंडळाचे खासियत.. चिंचपाडा आजूबाजूच्या भागातील नागरिक आपले नवस बोलण्यासाठी देवीकडे साकडं घालण्यासाठी येत असतात देवी घटस्थापनेपासून ते विसर्जनापर्यंत सकाळ /संध्याकाळ दैनंदिन देवीची ८ वाजता महाआरती होते. मंडळांनी गुरुवार दिनांक दोन नोव्हेंबर रोजी सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत भंडारा महाप्रसाद आयोजित केला आहे तसेच देवी तीन नोव्हेंबर रोजी सायं. विसर्जन सोहळा आयोजित केला असून विसर्जनाच्या दिवशी मंडळ लाईट डॉल्बी चा वापर न करता पारंपारिक वाद्याच्या तालावर देवींची विसर्जनाची सांगता करतात...!! या कार्यक्रमासाठी श्री.किशन सिंह,श्री. तेजश भुगे,श्री. रामजी देवाशी, श्री. रमेश भागवत, श्री. अमृतलाल जैन, श्री. सुभाष भोईर,श्री. हरीश म्हात्रे, श्री.संतोष शेलार, श्री. मनोहर चौधरी, श्री. आनंद तिवारी, श्री. शिवाजी चौगुले श्री.गणेश सौर्य श्री. मदन मारवाडी (स्वीट मार्ट),आणि संजीव सौर्य हे कार्यकर्ते मेहनत घेतात. अशी ही कल्याण पूर्वेची नवसाला पावणारी चिंचपाडाची नवदुर्गा...!! आई पर्यावरण संरक्षणासाठी सर्वांना जाणीवा दे...'कष्टाने मिळते तेच टिकते' हा पाठ सर्वांच्या ध्यानी असू दे'पृथ्वी मातेचा संहार टाळण्यासाठी, निसर्गचक्र अबाधित राखण्यासाठी सर्व मानवांना पर्यावरणाचे, सर्व प्रकारचे प्रदूषण टाळण्याची बुद्धि दे, प्लास्टिकच्या अतिवापरावर निर्बंध आणण्याचे शहाणपण दे. आई तू सकल विश्वाची निर्माती आहेस, फक्त तुझ्या भक्तांना योग्य मार्गावर आण. तंत्रज्ञानाच्या जगात माणूस माणसाजवळ येऊ दे.. सर्वांना आरोग्य चांगले दे..जय आई माता तुझ्याकडे फक्त इतकेच मागणं...!!

**शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**चिंचपाडा-कल्याण (पूर्व) मुंबई.**



# अतिवृष्टीमुळे नुकसान भरपाई म्हणून पंजाब सरकार शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रती हेक्टर देते, महाराष्ट्र सरकारला का देता येत नाही?

निसर्गाने अन्नदाता शेतकऱ्यांवर चौतर्फा भडीमार केला असुन शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे व अत्यंत चिंतेत आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.त्यामुळे आता यत्किंचितही वेळ न करता राज्यातील पक्ष विपक्षाच्या संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी संपूर्ण राजकीय मतभेद बाजूला सारून शेतकऱ्यांची सर्वोतोपरी मदत युध्दपातळीवर करण्याची खरी वेळ आली आहे. आज राज्यातील ९२ लाख हेक्टर जमीन पाण्याखाली आली आहे.यांना सरकार मदत म्हणून प्रती हेक्टर फक्त साडेआठ हजार रुपये मदत देण्याची घोषणा केली आहे.पंजाबमध्ये सुध्दा अशीच परिस्थिती होती तेव्हा पंजाब सरकारने शेतकऱ्यांसाठी प्रती हेक्टर ५0 रूपये जाहीर केले त्यामुळे आता प्रश्न आहे की पंजाब सरकारला ५0 हजार रुपये प्रती हेक्टर परवडतात मग देशाची आर्थिक राजधानी असलेल्या महाराष्ट्राला शेतकऱ्यांना ५0 हजार रुपये प्रती हेक्टर देण्यात काय अडचण आहे?माझ्या माहितीनुसार ही तुटपुंजी मदत म्हणजे मुंगीसाठी साखर एवढी मदत आहे.त्यामुळे हि मदत प्रती हेक्टर कमीत कमी ५0 हजार रुपये सरकारने जाहीर करण्याची गरज आहे. आज शेतकऱ्यांना सरकार कडून भिक नको सरळ मदत हवी. आता शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याची गरज नाही कारण निसर्ग स्वतः सांगत आहे की शेतकऱ्यांचे किती भयावह नुकसान झाले आहे आणि ही बाब महाराष्ट्रासह संपूर्ण देश उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.त्यामुळे शेतकऱ्यांच्या बाबतीत पंचनामे किंवा अन्य तपासणी न करता त्यांच्या बँक खात्यात सरसकट प्रती हेक्टर ५0 हजार रुपये व सर्वोतोपरी मदत केली पाहिजे सोबतच वित्तीय हानी,शेतीची हानी आणि जमिनजुमल्याची हानीची ताबडतोब स्थानिक प्रशासनाने पडताळणी करून तात्काळ मदत पुरविली पाहिजे व कर्जमुक्त केले पाहिजे. कारण शेतकरी जगला तरच आपल्याला अन्न पुरवठा होईल व देशाची १४0 कोटी जनता जगेल हा मुलमंत्र आजच्या संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी, राज्य सरकारांनी व केंद्र सरकारने लक्षात ठेवले पाहिजे.आज राज्यातील आजी माजी राजकीय पुढाऱ्यांजवळ करोडोंची मोठ्या प्रमाणात चलअचल संपत्ती आहे आणि राजकीय पुढाऱ्यांमध्ये खरोखरच माणुसकी असेल तर आपल्या संपत्तीचा फक्त १0 टक्के भाग या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांच्या जखमेवर फुंकर घालण्यासाठी वापरला पाहिजे. ही प्रक्रिया एकट्या महाराष्ट्रानेच नाही तर संपूर्ण भारतातील राजकीय पुढाऱ्यांनी अंगिकारली पाहिजे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.कारण सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांची वित्तीय हानी, जीवीत हानी,पशु हानी मोठ्या प्रमाणात झाली आहे आणि त्याच्या डोळ्यातील अश्रूच्या धारा वाहत आहे.राजकीय पुढाऱ्यांनो आपण कृषिप्रधान देशात रहातो ही बाब कदापि विसरू नका. कारण आजही राज्यासह देशातील अनेक भाग पावसाच्या बाबतीत रेड अलर्टवर आहेत आभाळ फाटत आहे.महाराष्ट्रातील अतिवृष्टीची व्यथा मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारपर्यंत पोसचविली आहे ती मदत येण्याच्या आधी राज्यातील राजकीय पुढाऱ्यांची,स्थानिक प्रशासनाची व सरकारची मदत ताबडतोब शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. राज्यातील संपूर्ण मंत्र्यांसह राजकीय पुढाऱ्यांनी आपले संपूर्ण दौरे रद्द करून शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आत्मचिंतन करावे व मदतीचा हात सामोरं करावा.कारण महाराष्ट्रातील संपूर्ण शेतकरी आज पाण्याखाली आला आहे त्याला या दुःखातुन बाहेर काढण्यासाठी आज राजकीय पुढारी, स्थानिक प्रशासन, सरकार व राज्यातील जनतेने सामोरं येण्याची गरज आहे व सर्वांनीच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे.या आपात्कालीन परिस्थितीत एकही पीडीत शेतकरी सुटणार नाही याचीही काळजी सरकारने घ्यावी.कारण परिस्थिती भयानक आणि चिंताजनक आहे सोबतच पाऊसाचा जोर अजुनही कमी झालेला नसुन जसाचा तसाच आहे.आता सरकारने शेतकऱ्यांच्या कोणत्याही कर्जाचा विचार न करता सरसकट कर्ज माफी करावी आणि ही संपूर्ण वसुली राजकीय पुढाऱ्यांच्या खिशातून करावी.कारण आज करोडपती शेतकरी हवालदिन होऊन शुन्य झाला आहे आणि पाच वर्षे लोकप्रतिनिधी पद भोगलेला राजकीय पुढारी करोडपती झाला असून मोठ्या प्रमाणात चलअचल संपत्तीचा मालक आहे व सात पिढ्या बसून खाईल इतकी संपत्ती आज राजकीय पुढाऱ्यांजवळ आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची मदत कुठेही थांबणार नाही याची जाण सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे. कारण अन्नदात्या शेतकऱ्यांचे सर्वंच पीके अतिवृष्टीमुळे पाण्याखाली आली आहे.राजकीय पुढाऱ्यांनी बांधावर जाऊन फक्त फोटो काढू नका कृती करा.सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी ताबडतोब अन्नधान्य व जिवनावश्यक वस्तूंचा मुबलक पुरवठा शेतकऱ्यांना करावा.सोबतच सरकारने शेतकऱ्यांना शेती लागवडीसाठी आलेला खर्च व प्रती हेक्टर ५0 हजार रुपये नुकसानभरपाई म्हणून ताबडतोब उपलब्ध करून द्यावे.आज शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था, देवस्थानच्या संस्था, शाळा-महाविद्यालये व राज्यातील नागरिक मदतीसाठी सरसावले आहेत.या संपूर्ण बाबींची जान सरकारने गांभीर्याने घ्यावी व सरकार मार्फत शेतकऱ्यांना हवी ती संपूर्ण मदत करावी. आपातग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे न करता सरसकट जास्तीत जास्त मदत करा. सध्याच्या परिस्थितीत अन्नदाता शेतकरी अत्यंत भयावह संकटात सापडलेला आहे.ढगफुपी व अती पाऊसाने मराठवाडा, कोकण, विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राला पुर्णतः जनु काय पाऊसाने वेढुन झोडपले आहे.यामुळे राज्यातील ७५ टक्के शेतकऱ्यांची शेती पाण्याखाली आल्याने त्यांचे जगणे असह्य झाले आहे व त्यांचा संपूर्ण परिवार अत्यंत दुःखी आहे.देशासह राज्यातील संपूर्ण शेतकऱ्यांची धुरा निसर्गावर अवलंबून असते.परंतु निसर्ग नेहमीच साथ देत नाही.त्यामुळे प्रत्येक शेतकरी आपल्या पोटाची खळगी भरण्याइतकी कमाई करून घेतो.कारण प्रत्येक शेतकऱ्यांना ओला दुष्काळ आणि सुका दुष्काळाचा सामना करावा लागतो आणि याच संघर्षातुन उत्पन्न काढत असतो व १४0 कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरत असतो.परंतु आज देशासह राज्यातील प्रत्येक शेतकरी अती पाऊसामुळे अत्यंत कठीण परिस्थितीत सापडला आहे. अस्मानी संकटामुळे राज्यातील शेतकऱ्यांची भयावह स्थिती मागील महिन्यांपासून संपूर्ण भारतात पाऊसाने उग्र रूप धारण करून अनेक ठिकाणी ढग फुटीच्या घटना झाल्या.या संपूर्ण घटनांचा सरकारने गांभीर्याने दखल घेवून राज्यातील काही विकास कामे व इतरत्र खर्च बाजूला सारून शेतकऱ्यांच्या मदतीला सरकारने सर्वतोपरी प्राधान्य देवून मदत केली पाहिजे व अतीवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी सरकारने ओला दुष्काळ जाहीर करावा.सोबच राज्यातील बॉलिवूड क्षेत्र,पुंजीपतीवर्ग व व्यापारीवर्ग यांनी सुध्दा शेतकऱ्यांना सरळ हातांनी मदत करण्यासाठी सामोरे येण्याची गरज आहे.जय हिंद.जय जवान जय किसान.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९0७७९, नागपूर.**

## पान १ वरुन

### जालना जिल्ह्यात ...

आहे. बदनापूर, अंबड, मंठा, घनसावंगी आणि जाफराबाद तालुक्यातही हीच गंभीर परिस्थिती आहे. घाणेवाडी आणि मोती तलाव ओव्हरफ्लो: शहराची तहान भागवणारे हे दोन्ही प्रमुख जलस्रोत तुडुंब भरले असले तरी, पुरामुळे शहरात मात्र हाहाकार माजला आहे. या सर्व नुकसानीचे तातडीने सरसकट पंचनामे करून, व्यापाऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई द्यावी, अशी तीव्र मागणी आता जोर धरत आहे.

या अतिवृष्टीचा सर्वात मोठा आणि विनाशकारी फटका जिल्ह्यातील बळीराजाला बसला आहे. अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्यामुळे शेतांमध्ये पाणी साचून पिके पूर्णपणे सडली आहेत. मात्र, याहूनही भयंकर बाब म्हणजे पाण्याचा प्रचंड प्रवाह आणि वेगामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी मोठ्या प्रमाणावर खरडून गेल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे अपरिमित नुकसान झाले असून, जमिनीची माती वाहून गेल्याने शेतीचे भविष्यातील अस्तित्वच धोक्यात आले आहे. या विनाशकारी संकटाने जिल्ह्यातील शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे.

**'फोटोशूटच्या पाहण्या थांबवा; शेतात उतरा!'**

महसूल विभागामार्फत सध्या पंचनाम्यांची केवळ औपचारिकता सुरू आहे, परंतु शेतकऱ्यांचे नुकसान इतके मोठे आहे की त्यांना कागदी कार्यवाही नव्हे, तर तात्काळ आणि कठोर दिलासा मिळणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर, जालना जिल्ह्यातील शेतकरी आता आक्रमक झाले आहेत! त्यांनी शासनाकडे एकमुखाने 'ओला दुष्काळ' त्वरित जाहीर करण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांच्या वतीने व्यक्त होत असलेल्या तीव्र भावना अशा आहेतः शासनाच्या प्रतिनिधींनी केवळ फोटोशूटसाठी पाहणी दौरे करणे थांबवावे! एसी केबिनमधून बाहेर पडा आणि शेतात उतरून 'खरी' आणि 'विनाशकारी' स्थिती बघा! कोणतीही दिरंगाई न करता तातडीने कठोर पाऊले उचलून शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढा!

या नैसर्गिक आपत्तीमध्ये जर शासनाने त्वरित ठोस पाऊले उचलली नाहीत, तर शेतकऱ्यांचा उद्रेक आणि आंदोलने होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### आ. अर्जुन खोतकर ...

मागणी केली. यावर प्रतिसाद देताना खोतकर म्हणाले, कुंभेफळ गावाला जोडणारा मजबूत व नवा पूल तातडीने मंजूर करून बांधला जाईल. सरकारकडे यासाठी मी स्वतः पाठपुरावा करीन.

दरम्यान, परिसरातील शेतपिकांचे मोठे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांनी खोतकरांसमोर मांडले. सरसकट नुकसानभरपाई देण्याची त्यांची मागणी योग्य असून ती निश्चित पूर्ण केली जाईल, असेही खोतकरांनी स्पष्ट केले. यावेळी शेतकऱ्यांनी 'ओला दुष्काळ जाहीर करावा' अशी मागणी केली. यावर बोलताना खोतकर म्हणाले की, सध्या मुख्यमंत्र्यांनी ओला दुष्काळ जाहीर केलेला नाही. परंतु एक-दोन दिवसांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या विषयावर निर्णय घेतील. आमची देखील सरकारकडे मागणी आहे की, ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई द्यावी. मुसळधार पावसामुळे शेतपिकांचे मोठे नुकसान झाले असून पाण्याच्या प्रवाहाने अनेक जमिनी खरडून गेल्या असल्याचेही शेतकऱ्यांनी सांगीतले.

जालन्याच्या कुंभेफळ येथे मुसळधार पावसामुळे नदीला पूर आला असून गावाच्या मुख्य मार्गावरून पुराचे पाणी वाहत आहे. यामुळे शेतीपिकांचं नुकसान झालंय. या नुकसानीची आमदार अर्जुन खोतकर यांनी कमरेइतक्या पाण्यातून प्रवास करत पाहणी केलीय. यावेळी पीक नुकसानीचे सरसकट पंचनामे करून राज्यात ओला दुष्काळ जाहीर केला पाहिजे, अशी मागणी खोतकर यांनी केलीय.

### जालना महापालिकेच्या ...

काम करून टक्केवारी मिळवणे, एवढेच ध्येय ठेवले होते का? नागरिकांच्या श्रद्धा, सुरक्षेचा विचार न करणे हे जबाबदारी टाळण्याचे उदाहरण नाही काय?

विसर्जनाच्या काळात अडचण निर्माण झाल्यास जबाबदार कोण ठरणार?

**नागरिकांमध्ये संतापाची लाट**

नागरिक, व्यापारी आणि सामाजिक संघटनांकडून महापालिकेवर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दुर्गोत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने तातडीने पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे. कोटींचा खर्च करून कुंड पाण्याखाली दडपवायचा आणि विसर्जनाच्या वेळी नागरिकांना संकटात टाकायचे, हे प्रकार शहराच्या शिरपेचाला शोभणारे नाहीत, अशी टीका केली जात आहे. महापालिकेने विसर्जन कुंड वापरण्यायोग्य आहे की नाही, याची स्पष्ट हमी द्यावी आणि व्यापाऱ्यांच्या नुकसानीला जबाबदार कोण, याचे उत्तर द्यावे.

# सुप्रिया कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये फार्मासिस्ट डेनिमित्त विविध कार्यक्रम



**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी** - जागतिक फार्मासिस्ट डे निमित्त महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रम आयोजित केले होते ज्यात वृक्षारोपण,ऑनलाईन प्रश्नमंजुषा, जेनेरिक मेडिसिन बद्दल जनजागृती याप्रकारचे विविध कार्यक्रम पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य एम.एन.पठाण सर यांच्या हस्ते पार पडले.यावेळी विविध मान्यवरांनी व विद्यार्थ्यांनी फार्मसिस्ट चे कार्याबद्दल मनोगत व्यक्त केले. यावेळी मंचावर उपस्थित प्रा. शिवम सोनसाळे, प्रा. कल्याणी परिहार, प्रा. रुपाली तायडे, प्रा. प्रतिक्षा जोशी, प्रा. पौर्णिमा बनकर, अजय महामुने, राजेंद्र साखरे, वर्षा देशमुख, पूजा बोडखे, मुकेश पांडव,लहू जोशी, कैलास बकाल ई.मान्यवर उपस्थित होते.

# गुणीवंतांचा व स्थानिक पत्रकार संघाचा मानव सेवा मंडळा कडून सत्कार

**विशाल देशमुख**
**टेंभुर्णी** - येथील स्थानिक पत्रकार संघाचा नवीन कार्यकारणीचा नुकताच एका छोट्या खाणी कार्यक्रमात मानव सेवा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी स्थानिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी शिक्षक शेख साबेर,उपाध्यक्षपदी सुनील जोशी व सचिव पदी प्रल्हाद जाधव यांची नुकतीच निवड झाली त्याबद्दल त्यांचा येथील महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयात एका छोट्याखाणी कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. सोबत येथील रील स्टार प्रताप नवले यांनी नुकतीच भावी सरपंच म्हणून एक शॉर्ट फिल्म बनवले त्यामुळे या भागातील एक पत्रकार मित्र आपल्या कल्पनेतून पुढे जात असून नावलौकिक मिळत आहे याबद्दल रिअल स्टार प्रताप नवले व तालुका पत्रकार संघाच्या कार्यकारणीत विष्णू मगर यांची निवड झाल्याबद्दल या सर्वांचा यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला.

येथील सार्वजनिक महात्मा फुले वाचनालय येथे झालेल्या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ पत्रकार पी जी तांबेकर सिताराम भाले शेख साबेर प्रल्हाद जाधव सुनील जोशी प्रताप नवले रावसाहेब अंभोरे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती यावेळी मानव सेवा मंडळाच्या वतीने संजय राऊत अलकेश सोमाणी रावसाहेब अंभोरे शेख नसीम यांनी आपले मनोगत मांडत या सर्वांचे अभिनंदन केले.या वेळी संजय निकम गजानन डोमळे बालाजी शेवाळे ज्ञानेश्वर उखर्डे अशोक पाबळे गोविंद जाधव, विष्णू जोशी,सुनिल भाले,शेख अर्शद, सोमनाथ अंधारे, सुनील अंभोरे, साई बोर्डे, बी डी सवडे लक्ष्मण धारे, यांच्या सह पत्रकार आणि मानव सेवा मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

आपल्या सत्कार ला उत्तर देता वेळी दिलेल्या जबाबदारीचे चे योग्य पालन करून पदाला न्याय देण्याची भूमिका शेख साबेर प्रताप नवले प्रल्हाद जाधव सुनील जोशी यांनी सांगितले.



# अध्यापनातून शिक्षकाला मिळणारे समाधान सर्वोच्च - विनोद कळंबे

**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी** - अध्यापनातून शिक्षकाला मिळणारे समाधान सर्वोच्च असल्याचे प्रतिपादन जाफराबाद तालुका जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेचे माजी चेअरमन विनोद कळंबे यांनी केले. खानापूर जिल्हा परिषद शाळेतून श्री कळंबे आणि दिनेश डोईफोडे यांची बदली झाल्यामुळे आयोजित निरोप समारंभ ते बोलत होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साधन व्यक्ती नारायण पिंपळे होते तर यावेळी सरपंच शेषराव जाधव ,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विश्वास शेळके,उपाध्यक्ष नंदू तायडे, केमिस्ट संघटनेचे अध्यक्ष गजानन शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना श्री कळंबे म्हणाले की बदली हा प्रशासकीय व्यवस्थेतील अविभाज्य घटक असून सात वर्षापेक्षा जास्त काळ खानापूर जिल्हा परिषद शाळेत सेवा बजावल्यामुळे विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांच्याशी घट्ट नाते तयार झाले होते. या सेवा काळात खानापूरकरांनी दिलेले प्रेम आयुष्यात आणि भविष्यात विसरता येणार नाही असेही ते म्हणाले. यावेळी नारायण पिंपळे यांनी श्री कळंबे यांच्या सेवा काळातील कार्याचा गौरव केला.चांगले काम करणाऱ्या शिक्षकांना ग्रामस्थांकडून मिळणारा सन्मान हा आदर्श पुरस्कारापेक्षा ही श्रेष्ठ असल्याचे ते म्हणाले.यावेळी ग्रामस्थांकडून श्री कळंबे आणि श्री डोईफोडे यांचा सन्मान चिन्ह,शाल, पुष्पगुच्छ देऊन



गौरव करण्यात आला.यावेळी सुभाष तायडे, ऋषी शेळके, कैलास तायडे, दमोता तायडे, विठ्ठल तायडे,रामदास शेळके ,कौतिक तायडे,भगवान शेळके,काशिनाथ तायडे, मंगेश शेळके, बालाजी शेळके,महादू शेळके, मधुकर शेळके, बळीराम शेळके, मारुती शेळके, गजानन शेळके, पंढरीनाथ शेळके, प्रकाश शेळके, जनार्दन तायडे, शिवाजी शेळके,सूर्यकांत शेजुळ, प्रदिप शेळके,उमेश शेळके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी रामदास शेळके यांनी ही मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुख्याध्यापक रामकृष्ण गीते यांनी केले.कार्यक्रमासाठी रामकृष्ण गीते,शारदा कायंदे, सिद्धेश्वर डोईफोडे,पूर्णाबाई शिंदे, नीता हिवरे,कल्याणी तायडे यांनी परिश्रम घेतले.

# गोषेगाव परिसरात अतिवृष्टी पिकांचे नुकसान

**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी** - गोषेगाव तालुका भोकरदन येथे झालेल्या पावसामुळे अतिवृष्टी झाली त्यात पाऊस अतिप्रमाणात झाल्यामुळे पुरामध्ये काही घरांमध्ये पाणी घुसले आहे. तसेच अनेक शेतकऱ्यांच्या शेतात मका, सोयाबीन इतर पीक यांचे नुकसान झालेले दिसत आहे. गावामध्ये त्यातल्या त्यात पायनर कंपनीची भिजवाई खराब त्याच शेतकऱ्याची पूर्ण मक्काचा नुकसान आणि आता हे अतिवृष्टी आणि पावसाने हे नुकसान कुठे नेऊन ठेवलाय माझा शेतकरी खूप मोठा नुकसान झाला आहे शेतकऱ्याचं शासनाने याची ताबडतोब दखल घ्यावी असे आव्हान सर्व शेतकरी आणि समाजसेवक ज्ञानेश्वर मोहिते यांनी केले आहे.




# आर्थिक साक्षरता, जनजागृती कार्यक्रम, बँकिंग तक्रार निवारण कार्यशाळाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हा व्यापारी महासंघ जालना व भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय), मुंबई गोवा यांच्या यांच्या संयुक्त विद्यमानेआरबीआय लोकपाल योजना २०२१ वर आधारित जनजागृती कार्यक्रम आणि बँकिंग तक्रार निवारण कार्यशाळा चे आज सोमवार, २९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता जालना येथील हॉटेल विजय विलास मामा चौक येथे आयोजन केले आहे.

या कार्यक्रमात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, दुकानदार, व्यापारी आणि सामान्य जनतेच्या बँकिंग समस्यांशी संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी आरबीआय लोकपाल योजना २०२१ अंतर्गत मोफत तक्रार निवारण यंत्रणेची माहिती मुंबईहून आलेले आरबीआयचे अधिकारी देतील . नागरिकांना सायबर आणि डिजिटल फसवणुकीबद्दल देखील माहिती दिली जाईल.

या कार्यक्रमात मुंबई येथील आरबीआय चे अधिकारी आणि जिल्ह्यातील वरिष्ठ बँक अधिकारी मार्गदर्शन करतील आणि जनजागृतीसाठी आवश्यक साहित्य वाटले जाईल. जालना जिल्ह्यातील सर्व व्यापारी आणि नागरिकांना जालना जिल्हा व्यापारी महासंघ व आरबीआय मुंबई गोवा यांनी आयोजित केलेल्या या उपयुक्त कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली आहे. या कार्यक्रमा लघु उद्योग भरती, क्रिडाई संघटना जालना तसेच जिल्ह्यातील व तालुक्यातील सर्व व्यापारी संघटना यांचे विशेष सहकार्य राहणार आहे. तरी व्यापारी बांधवांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## स्पर्धा परीक्षा संपन्न

**टेंभूर्णी** - मानव विकास व पूर्ण निर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना शाळेमध्ये मी ज्ञानवंत गुणवंत यशवंत या उपाक्रमांतर्गत इतिहास विषयाशी संबंधित सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा पार पडली या स्पर्धेमध्ये इयत्ता पाचवी ते बारावी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला शाळेतील इतिहास शिक्षक श्रीमती लकडे मॅडम प्राथमिक इतिहास शिक्षक श्री गरुड सर तसेच माध्यमिक इतिहास शिक्षक श्री जाधव सर यांनी ही स्पर्धा आयोजित केली होती.

## वाचकांचे मनोगत

### निवडणूका डोळ्यासमोर ठेवून नऊ वर्षांनी वस्तू सेवा कर कमी केला

केंद्र सरकारने देशात जुलै २०१६ पासून देशातील वस्तूचे दर स्थिर ठेवण्यासाठी वस्तू सेव कर लागू केला त्यास ९ वर्षे झाली.उपहारगृहातील खाद्यपदार्थ महागले.किमान तीस टक्के लोक उपहारगृहातील पदार्थावर उपजीवीका करतात. त्यांनाही वस्तू सेवा कराचे चटके बसले.नवीन घर खरेदी करताना १२% वस्तू सेवा कर भरावा लागला.मुंबईतील घरांच्या किंमती करोडो रुपयांपर्यंत पोहचल्या खरेदी दारांना याचे चटके बसले.देशभरातील होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणूका तर कारण नाही ना ? ९ वर्षे जी एस टी ने मोठ्या प्रमाणात महसुलात वाढ झाली. पन्नास टक्के केंद्र सरकार व पन्नास टक्के महाराष्ट्र सरकारला महसूल वस्तू सेवा करातून मिळाला.थोड्याफार प्रमाणात नागरिकांना दिलासा मिळेल. पुढे काही महिन्यांनी ते वाढ करतील की नाही हे सांगता येणार नाही?

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

# प्रचंड भ्रष्टाचाऱ्यांमुळे महाराष्ट्राला निसर्गाने झोडपले

अतिवृष्टीमुळे काही जिल्ह्यांच्या शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. हा नैसर्गिक कोप असला तरी त्याला बऱ्याच अंशी आपलेच काही भ्रष्ट दुष्ट नाठाळ लोक जबाबदार आहेत.आपल्या शेतकरी बांधवाना अश्या बिकट परिस्थितीत सर्वतोपरी मदत करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. शेतकऱ्यांच्या जीवावर मोठे झालेल्या आडतदारानी आपल्या थैल्या मोकळ्या केल्या पाहिजेत.काही ठिकाणी शिक्षकांनी एक दिवसाचा पगार दिला तर लालबागच्या राजाने पन्नास लाखाची मदत जाहीर केली. राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळेल त्यात भ्रष्टाचार होणार नाही ना ह्याची दक्षता घेतली पाहिजे केंद्र सरकार आपलेच जमा पैसे मदत म्हणून पाठवणार ते शेतकऱ्यांचा अंत न पाहता लवकर पाठवावे. विम्याच्या पैश्याचे वाटप तातडीने करा. कदाचित पाप आणि भ्रष्ट मार्गाने कमावलेल्या पैसा कोण्या एका बिल्डर नेत्याने एकावन्न लाखाची मदत केली ती परत करावी. एंजियो,गणेश,नवरात्र मंडळ,मंदिर,दर्गा, मदरसे सारख्या संस्थानी मोठ्या प्रमाणात मदत करावी.निरपेक्ष भावनेने संस्था चालवणाऱ्यानी मदत फेरी काढून अन्नधान्य,औषधे,बीबियाणे,कपडेलत्ते,पैसे जमा करून शेतकऱ्यांना मदत करावी.भ्रष्ट नसलेल्या पेन्शन घेणाऱ्या व्यक्तींनी पेन्शनमधील पाच ते पंचवीस टक्के पेन्शन शेतकऱ्यांना मदत करावी. क्रिकेटपटू,खेळाडू,बॉलिवूड मधील सेलिब्रिटींनी भरघोस मदत करावी. शेतकऱ्यांना शासन,प्रशासनातील सर्व अधिकारी,नोकरदार वर्गाने ज्यांचे हात भ्रष्टाचाराने कलंकित झाले नाहीत अशानीच मदत करावी. पीडित शेतकऱ्यांनो भविष्यात नैसर्गिक कोप होऊ नये म्हणून काही काळ त्रास होईल तो सहन करा. पण,सरकार व विरोधी पक्ष लोकप्रतिनिधी भ्रष्ट असतील असे मंत्री आमदार खासदार नेते ह्यांचा एक दिवसाचा पगार मदत म्हणून देतील तो पीडित शेतकऱ्यांनी स्वीकारू नये.कारण असे लोकप्रतिनिधी हे गेंड्याच्या कातडीचे व कोडग्या विचारांचे असतात.भविष्यात दिलेली मदत भ्रष्टमार्गाने परत ओरबाडून घेतील.असा पापी,कलंकित पैसा शेतकऱ्यांना पचणार नाही,कारण त्या पैशाला अनेकांचे तळतळाट लागलेले असतात.भ्रष्टाचारी लोकांनी सुद्धा शेतकऱ्यांचे आयुष्य उध्वस्त होऊ नये.भविष्यात नैसर्गिक कोप होऊ नये म्हणून जनाची नाही तर मनाची लाज बाळगून,आपल्या कुटुंबाची शपथ घेऊन भ्रष्ट मार्गाने कमावलेला पैसा शेतकऱ्यांना मदत म्हणून देऊ नये हि सर्व भ्रष्टाचाऱ्यांना कळकळीची विनंती.

**यशवंत चव्हाण सीबीडी, बेलापूर.**
**मो.९९२०७७६२७७**

# शेतातून पाणी वाहत नाही तर शेतकऱ्यांचे रक्त वाहतेय...

सध्या महाराष्ट्रासह सबंध देशात पावसाने व पुराने थैमान घातले आहे. गाड्यांची वाहतूक म्हणजेच दळणवळण व्यवस्था ठप्प झाली आहे. कुठे कुठे तर पुराच्या पाण्याने लहान मोठ्या गाड्या सुध्दा वाहून जात आहेत. माणसे वाहून जात आहेत, गुरेढोरे वाहून जात आहेत, काही गावांमध्ये पावसाच्या पुराने छोटी-मोठी घरे सुद्धा वाहून गेली आहेत. ही परिस्थिती सध्या महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. नद्या, नाले, ओढे व तलाव पाण्याने पूर्णपणे दुथडी भरून वाहत आहेत. यांमध्ये येणारे पाणी हे संपूर्णतः शेतकऱ्यांच्या शेतातून येत आहे. शेतकऱ्यांच्या शेताला सध्या तलावाचे स्वरूप आले आहे. एवढा पाण्याने हाहाकार घातला आहे. शेतातील हिरवळीने नटलेले व डौलाने नाचू आगलेले जोरदार पिक जसे की, कापूस, सोयाबीन, मूग, उडीद व ऊस अतिवृष्टीच्या तडाख्याने व पावसाच्या माऱ्याने अस्ताव्यस्त झाला आहे. कापसाला लागलेली चाफे व बोंडे पावसाच्या तडाख्याने गळून पडली आहेत. सोयाबीन, मुग व उडीद तर पावसाच्या साचलेल्या पाण्यात बुजून गेला आहे. विविध फळांच्या फळबागांचा पावसाने नायनाट केला आहे. इतके प्रचंड प्रमाणात पाणी शेतकऱ्यांच्या शेतात साचले आहे. शेतकऱ्यांना शेतात जायचे म्हटले तर कसे जावे? हा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतातील गंभीर व भयावह परिस्थिती पाहून शेतकरी हवालदिल व नाराज झाले आहेत.



उन्हाळ्यापासून शेतकरी शेतात पेरणीची तयारी करतात. अतिशय मेहनतीने व बेजार होऊन शेतीची मशागत करतात. अंगातील रक्त आटवून व रक्ताचे पाणी करून शेतकऱ्यांनी शेतात धान्य पिकवलेले असते. यंदा पिक सुद्धा जोमात व जोरात आले. यंदा पावसाने चांगली साथ दिली म्हणून शेतात पीक धान्य सुद्धा जोरात आले. नेमकेच शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक आणि यातच अतिवृष्टीने दिलेला जोरदार दणका यात शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. शेतकऱ्यांच्या तोंडात आलेला घास पावसाने हिरावून नेला आहे. शेतात यावर्षी चांगली बरकत होणार म्हणून शेतकरी यंदा आनंदात होते. यंदा दिवाळी गोड होणार म्हणून शेतकऱ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. परंतु या महापुरात शेतकऱ्यांच्या शेताला तळ्याचे स्वरूप आल्याने संपूर्ण शेती जलमय झाली आहे. शेतकऱ्यांच्या शेतातून पाणी वाहत नाही तर ते शेतकऱ्यांचे रक्त वाहतेय असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. निसर्गाचा कोप, मुला मुलींचे लग्न, घर प्रपंच आणि कर्जबाजारीपणामुळे यंदा आत्महत्येत प्रचंड वाढ होते की काय असे मला वाटत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या टाळायच्या असतील, शेतकऱ्यांना सुखी व समाधानी बघायचे असेल, शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यायचा असेल आणि शेतकऱ्यांचे झालेले नुकसान त्वरित पंचनामे करून त्यांच्या खात्यावर योग्य ती रक्कम द्यायची असेल तर शासनाने याचा विलंब न करता त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर योग्य ती रक्कम देऊन आर्थिकदृष्ट्या कमकुवत शेतकऱ्यांना खंबीर व मजबूत करावे आणि शेतकऱ्यांच्या शेतातून वाहू लागलेले शेतकऱ्यांचे रक्त थांबवावे एवढेच सरकारला माझे पोटतिडकिने सांगणे आहे. शेतकरी जगला तरच हे सुंदर जग टिकणार आहे.ज्या दिवशी शेतकरी शेती पिकवणे बंद करतील त्या दिवशी हे जग ठप्प होईल आणि देशात उपासमारीची समस्या निर्माण होईल, एवढे मात्र नक्की...

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## एएसके मल्टिसर्व्हिस; टाटा सोलार स्टॉलला आमदार अर्जुन खोतकर यांची भेट



**जालना । प्रतिनिधी -** क्रेडाई जालना आणि दिव्य मराठी जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य प्रॉपर्टी एक्स्पो २०२५ मध्ये प्रॉपर्टी, घरे, रोहाऊस, बंगले, व प्लॉट्सच्या आकर्षक डील्स सोबतच या एक्स्पोचे विशेष आकर्षण ठरला तो म्हणजे एएसके मल्टिसर्व्हिस - टाटा सोलार चा स्टॉल.

सोलार उर्जा ही काळाची गरज असून, पर्यावरणपूरक तसेच किफायतशीर उपाय म्हणून नागरिकांची वाढती पसंती या स्टॉलमध्ये दिसून आली. शहरासह ग्रामीण भागातील अनेक इच्छुक ग्राहकांनी सोलार साहित्य, विक्री, सेवा व उभारणी याविषयी उत्स्फूर्तपणे चौकशी केली.

आज एक्स्पोमध्ये आमदार अर्जुन खोतकर यांनी विशेष भेट देऊन टाटा सोलार स्टॉलला भेट दिली व सोलार उर्जेच्या प्रसाराला चालना देणाऱ्या उपक्रमाचे कौतुक केले. या भेटीमुळे स्टॉलला अधिक प्रतिसाद मिळाला असून, नागरिकांमध्ये विश्वासार्हतेची भावना निर्माण झाली आहे.

यावेळी शिवसेना संपर्क प्रमुख पंडितदादा भुतेकर, शिवसेना जिल्हा प्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले क्रेडाई जालना चे चेतन मराठे, सागर अग्रवाल, अविनाश भोसले, इंजि हुशे, विष्णू पाटेकर, ड्घ टाटा सोलार चे स्वप्नील कोकाटे, अधिराज कोकाटे, अमोल शिंदे, पवन सुर्वे, सिद्धी तांबट,सुशील पितांबरे यांचेसह क्रेडाई व दिव्यमराठी चे सदस्य उपस्थित होते.

एएसके मल्टिसर्व्हिस - टाटा सोलार जालना जिल्ह्यात अग्रगण्य ठरले असून, एकदा खर्च, रोजची बचत या तत्त्वावर आधारित सोलार सेवा नागरिकांसाठी खऱ्या अर्थाने ऊर्जा-क्रांती घडवत आहेत. एक्स्पोमुळे जालना व परिसरात सोलार उर्जेच्या विक्रीत मोठी वाढ होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### जायकवाडी धरणातील पाणीविसर्ग वाढ आणि आपत्ती व्यवस्थापन

# आमदार लोणीकरांची उपजिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा; सतर्क राहण्यासह केल्या सूचना

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील गोदावरी नदीकाठच्या गावांवर सध्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या कठीण परिस्थितीमध्ये आमदार बबनराव लोणीकर यांनी जिल्हा प्रशासनाशी सतत संपर्क साधत आहे. आज (२८ सप्टेंबर २०२५) जालना निवासी उपजिल्हाधिकारी (आर. डी. सी.) यांच्याशी चर्चा करताना त्यांनी आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना केल्या. जायकवाडी धरणातून २.२५ लाख क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने नदीकाठची शेती, सखल वस्त्या आणि रस्ते धोक्यात आहेत. या संकटकाळात प्रशासनाने सर्व संसाधनांचा वापर करावा, असे सांगत लोणीकर यांनी खालील मुद्द्यांवर भर दिला:

परिस्थितीची गंभीरता: नाशिक आणि अहमदनगरमधील अतिवृष्टीमुळे जायकवाडी धरण पूर्ण क्षमतेने भरले असून, २.५० लाख क्युसेकपेक्षा जास्त आवक होत आहे. यामुळे रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. जालना जिल्ह्यातील नदीकाठची गावे. विशेषतः सतर्क राहण्याची गरज आहे.

आर. डी. सी. यांच्याशी चर्चेत दिलेल्या सूचना

आपत्ती व्यवस्थापन प्रमुख म्हणून उपजिल्हाधिकारी (आर. डी. सी.) यांना संबोधित करताना लोणीकर यांनी तात्काळ उपाययोजनांसाठी खालील सूचना केल्या. या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निर्देशांनुसार (जसे की महसूल, पंचायत, पोलीस आणि आरोग्य विभागांना सज्ज राहण्याचे आदेश) आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (DDM) मार्गदर्शक तत्त्वांनुसार आहेत:

**एसटी महामंडळाच्या गाड्यांचा वापर -** नदीकाठच्या सखल भागातील रहिवाशांना स्थलांतरित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (चड्ठढउ) उपलब्ध बस आणि व्हॅनचा तात्काळ वापर करावा. जालना डेपोतील गाड्या (सध्या २००+ उपलब्ध) आपत्ती हेल्पलाइनशी जोडून २४ तास सेवा देण्याचे नियोजन करावे. उदाहरण: परतूर ते जालना मार्गावरील गावांसाठी विशेष शटल सेवा चालवावी, जेणेकरून गुराढोरा आणि कुटुंबांना सुरक्षित स्थळी (उदा. उंच भागातील शाळा) नेलं जाईल.

**शाळा खोल्यांचा उपयोग** जिल्ह्यातील सरकारी आणि खासगी शाळांच्या खोल्या तात्पुरत्या निवास आणि मदत केंद्र म्हणून वापराव्यात. जालना तालुक्यातील ५००+ शाळा (उदा. जिल्हा परिषद शाळा) साफसूफ करून आरोग्य तपासणी आणि अन्न वितरणासाठी सज्ज कराव्यात. सूचना: शिक्षण विभागाशी समन्वय साधून शाळा सुट्टीतही हे केंद्र चालवावेत. बालकांसाठी विशेष मदत केंद्र उभारावेत.

**कॉलेज सभागृहांचा वापर** - जालना जिल्ह्यातील महाविद्यालये आणि तांत्रिक संस्थांच्या सभागृहांचा वापर मोठ्या प्रमाणात स्थलांतरितांसाठी करावा. येथे १,०००+ क्षमतेची सभागृह उपलब्ध आहेत. अतिरिक्त: विद्यार्थ्यांच्या सहभागाने स्वयंसेवक पथके तयार करावीत, जे मदत वितरणात सहकार्य करतील.

**मंदिरे आणि देवस्थानच्या सभागृहांचा उपयोग** : जालना जिल्ह्यातील प्रमुख मंदिरे (उदा. ग्रामदेवता मंदिरे, जैन मंदिर परिसर) आणि देवस्थान समितीच्या सभागृहांचा वापर अन्न छावण्या आणि प्रार्थना केंद्र म्हणून करावा. हे ठिकाणे स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध असल्याने तात्काळ मदत शक्य होईल. सूचना: धार्मिक नेत्यांशी चर्चा करून हे सभागृह साफ करून आरोग्यविहीन ठेवावेत. येथे पाणीपुरवठा आणि वीज पुरवठा सुनिश्चित करावा.



**समन्वय आणि तयारी** लोणीकर यांनी सांगितले की, पुढील २४ तासांत पाण्याचा प्रवाह स्थिर होईपर्यंत नागरिकांनी घरीच राहावे. अफवा टाळण्यासाठी फक्त अधिकृत सूचना (जलसंपदा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय) पाळाव्यात.

**प्रशासकीय निर्देश** : जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (ऊॠ) ने महसूल, कृषी आणि आरोग्य विभागांना सतर्क केले आहे. हेल्पलाइन क्रमांक: १०७७ (राष्ट्रीय आपत्ती हेल्पलाइन) किंवा जालना जिल्हा कार्यालय: ०२४८२-२३१०००.

**ऐतिहासिक संदर्भ**: २००६ च्या महापुरासारख्या घटनांमधून शिकलेल्या धड्यांनुसार, संसाधनांचा एकात्मिक वापर करावा. जालना जिल्ह्यातील २०+ गावांना तात्काळ स्थलांतराचे आदेश आहेत.

**संभाव्य धोके आणि नागरिकांसाठी सल्ला**: नदी पातळीत ५-१० फूट वाढ अपेक्षित; शेती आणि रस्त्यांना धोका. मच्छीमार आणि सखल रहिवाशांनी नदीपात्र टाळावे; गुराढोरा उंच ठिकाणी हलवावा. स्थानिक बातम्यांनुसार जालना जिल्ह्यात रेड अलर्ट कायम आहे.

## सिताबाई शिवणगिरीकर यांचे निधन

**परतूर । प्रतिनिधी -** माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे स्विसहाय्यक सुनील शिवणगिरीकर यांच्या मातोश्री सिताबाई दत्तात्रय शिवणगिरीकर वय ८५ यांचे दिनांक २७ सप्टेंबर रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास राहत्या घरी निधन झाले होते त्यांच्यावर परतूर येथील वैकुंठधाम स्मशानभूमी येथे संध्याकाळी ८ वाजेच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्यासह विविध राजकीय,सामाजिक संघटनाचे पदाधिकारी, शैक्षणिक, प्रशासकीय, वैद्यकीय, पत्रकार यांच्यासह विविध क्षेत्रातील नागरिकांची उपस्थिती होती सीताबाई यांच्या पश्चात तीन मूल,सुना नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे



## आमदार अर्जुन खोतकर यांनी घेतली धनगर उपोषणकर्ते दीपक बोराडे यांची भेट

**जालना । प्रतिनिधी -** आमदार अर्जुन खोतकर यांनी धनगर उपोषणकर्ते दीपक बोराडे यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केलीय. धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी, या मागणीसाठी जालन्यात दीपक बोराडे यांनी आमरण उपोषण सुरू केलंय. त्यांच्या उपोषणाचा आज बारावा दिवस असून आज त्यांची आमदार अर्जुन खोतकर यांनी पुन्हा एकदा भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये काही वेळ चर्चा देखील झाली. आज पुन्हा सरकारचं शिष्टमंडळ बोराडे यांच्याशी चर्चा करण्यासाठी तयार आहे. मात्र, अजून बोराडे यांच्या मागण्या मुख्यमंत्र्यांपर्यंत गेल्या नाहीये. बोराडे यांच्या मागण्या मुख्यमंत्र्यांपर्यंत गेल्यानंतर पुढची प्रक्रिया सुरू होईल अशी माहिती आमदार खोतकर यांनी यावेळी बोलतांना दिलीय. यामुळे धनगर उपोषणकर्ते दीपक बोराडे यांचं उपोषण आज सुटण्याची शक्यता कमी असल्याचं बोललं जात आहे.








हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.